# महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे

## असक्षम लक्षणीय दिव्यांग उमेदवारांकरिता सामाईक प्रवेश परीक्षेदरम्यान लेखनिकाच्या आणि/अथवा अनुग्रह कालावधी वापरासंबंधी मार्गदर्शक सुचना

## Guidelines regarding use of Scribe (Reader/Writer) and/or Compensatory Time by the Candidates with limitations/ benchmark disabilities to read/write during CET Examination

केंद्र शासनातर्फे दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ अंतर्गत तरतुदी व कार्यालयीन ज्ञापन क्र.३४-०२/२०१५/डीडी-तीन, दि. २९ ऑगस्ट, २०१८ नुसार लक्षणीय (benchmark) दिव्यांगत्व असलेल्या व्यक्तीची परीक्षा आयोजित करण्याकरीता व लिहण्यास असक्षम असलेल्या लक्षणीय दिव्यांग उमेदवारांकरिता परीक्षेच्या वेळी उपलब्ध लेखनिक आणि/अथवा अनुग्रह कालावधी वापर करण्याच्या अनुषंगाने खालील मार्गदर्शक सुचना विहीत करण्यात येत आहेतः

१. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ नुसार किमान ४० टक्के लक्षणीय (benchmark) दिव्यांगत्व असलेल्या उमेदवाराने मागणी केल्यास, त्यास परीक्षा मंडळाने विहीत केलेल्या अटींच्या अधीन राहून लेखनिक (Scribe) व अनुग्रह कालावधी (Compensatory/ Extra time) अनुज्ञेय राहील.

२. लेखनिक आणि/अथवा अनुग्रह कालावधीची सुविधा घेण्याकरिता लक्षणीय (benchmark) दिव्यांगत्व असलेल्या उमेदवाराने शासनाकडून वेळोवेळी विहीत करण्यात आलेल्या नमुन्यातील वैध **दिव्यांगत्वाबाबतचे प्रमाणपत्र** (**Certificate of disabilities**) धारण करणे व ते विनंती अर्जासोबत (**प्रपत्र-१**), तसेच परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

३. लेखनिकाची आणि/अथवा अनुग्रह कालावधीची आवश्यकता असलेल्या दिव्यांग उमेदवाराने केंद्र शासनाच्या दिनांक २९ ऑगस्ट, २०१८ रोजीच्या मार्गदर्शक सुचनांव्दारे विहीत करण्यात आलेले दिव्यांगत्वमुळे उमेदवार **स्वतः उत्तरे लिहिण्यासाठी सक्षम नसल्याबाबतचे विहित प्राधिका-याने प्रमाणित केलेले प्रमाणपत्र** (**Certificate regarding physical limitation in an examinee to read/write**) धारण करणे व ते परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे (प्रमाणपत्राचा नमुना **प्रपत्र-२** सोबत जोडण्यात आला आहे).

४. खालील दिव्यांगत्व प्रकारातील उमेदवारांनी उत्तरे लिहिण्यासाठी सक्षम नसल्याबाबतचे प्रमाणपत्र (Certificate regarding physical limitation in an examinee to read/write) सादर करणे, अनिवार्य नाही.
   १) अंधत्व (Blindness)
   २) अस्थीव्यंग (दोन हात प्रभावित) (Locomotor disability-both arms affected -BA)
   ३) मेंदूचा पक्षाघात (Cerebral Palsy)

५. अशा उमेदवाराने स्वतः लेखनिकाची व्यवस्था करावी व खालील महत्वाच्या बाबींचे पालन करावेः
   ५.१. लेखनिकाची शैक्षणिक अर्हता उमेदवाराच्या शैक्षणिक अर्हतेपेक्षा किमान एक टप्पा कमी असणे आवश्यक आहे.
   ५.२. लेखनिक हा, कृषि किंवा संलग्न पदवी अथवा पदविका परीक्षा देत/ दिलेला नसावा.
   ५.३ दिव्यांग उमेदवारास ज्या परीक्षेकरिता लेखनिकाची मदत घ्यावयाची आहे, त्या परीक्षेकरिता संबंधीत लेखनिक त्याच वर्षी किंवा त्यापूर्वी कोणत्याही वर्षी उमेदवार असल्यास, उमेदवारास अशा लेखनिकाची निवड करता येणार नाही.

५.४ एखाद्या व्यक्तीने एका उमेदवारास लेखनिक म्हणुन मदत केल्यास सदर व्यक्ती त्याच उमेदवारास पुन्हा पुढील परीक्षांमध्ये लेखनिक म्हणून मदत करु शकेल. परंतु, लेखनिक म्हणून एखाद्या उमेदवाराला मदत केलेली व्यक्ती दुस-या उमेदवाराला लेखनिक म्हणून काम पाहू शकणार नाही.

५.५ कृषि विद्यापीठांमार्फत एखाद्या पदावर निवड झालेली व्यक्ती दिव्यांग उमेदवारास लेखनिक म्हणून काम पाहू शकणार नाही.

५.६ वेगवेगळया विषयांच्या पेपरसाठी वेगवेगळे लेखनिक घेण्याची दिव्यांगास परवानगी राहील. तथापि, एका विषयाकरिता एकच लेखनिक घेता येईल. उमेदवाराने त्याच्या विनंती अर्जामध्ये त्याप्रमाणे स्पष्ट उल्लेख करणे आवश्यक आहे.

**५.७ लेखनिकाच्या मदतीची आवश्यकता असलेल्या उमेदवाराने खालील कागदपत्रे सोबत जोडलेल्या प्रपत्र नमुन्यामध्ये सादर करणे आवश्यक आहे:**

(१) **विनंती अर्ज (प्रपत्र-१)**

(२) **उमेदवाराच्या ऑनलाईन अर्जाची छायांकित प्रत** (Application Print/Acknowledgment of PG/Ph.D-CET-2023 Online Application Form)

(३) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक अप्रकि-२०१२/प्र.क्र.२९७/आरोग्य-६, दिनांक ६ ऑक्टोबर, २०१२ अथवा शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक अप्रवि -२०१८/सीआर-४६/आरोग्य-६, दिनांक १४ सप्टेंबर, २०१८ नुसार संगणक प्रणालीव्दारे वितरीत करण्यात आलेले **विहित नमुन्यातील व कायमस्वरुपी किमान ४० टक्के दिव्यांगत्व असल्याबाबतच्या प्रमाणपत्राची छायांकित प्रत.**

(४) **दिव्यांगत्वामुळे उमेदवार स्वत: उत्तरे लिहिण्यासाठी सक्षम नसल्याबाबत विहित प्राधिकारा-याने प्रमाणित केलेल्या प्रमाणपत्राची छायांकित प्रत (Certificate regarding physical limitation in an examinee to read/write)**
**(सोबत जोडलेल्या नमुन्यामध्ये प्रपत्र-२)**

(५) **लेखनिकाच्या आधार कार्डची छायांकित प्रत**

(६) **स्वत:चा लेखनिक वापरण्यासंदर्भात मूळ वचनपत्र (Undertaking) (प्रपत्र-३)**

६. **केवळ अनुग्रह कालावधीची (Compensatory/ Extra time) मागणी करणा-या उमेदवाराने वरील नमुद ५.७ मधील केवळ (१),(२),(३) व (४) प्रमाणे कागदपत्रे सादर करणे अनिवार्य आहे.**

७. लेखनिकाची मदत घेणारे केवळ अनुग्रह कालावधीची मागणी केलेल्या दिव्यांग **उमेदवारांना परीक्षेच्या प्रत्येक तासासाठी वीस मिनिटे याप्रमाणे एकूण ४० मिनिटे** अनुग्रह कालावधी (Compensatory/ Extra time) अनुज्ञेय राहील.

८. लेखनिक आणि/अथवा अनुग्रह कालावधीकरिता केलेला विनंती अर्जातील तपशील संपूर्णपणे भरलेला असणे व त्या उमेदवाराची स्वाक्षरी/अंगठा तसेच, लेखनिकाची स्वाक्षरी (लागू असल्यास) असणे आवश्यक आहे.

९. **दिव्यांग उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रांसह केलेल्या विनंती अर्जाची सॉफ्टकॉपी संबंधीत मा. परीक्षा केंद्र प्रमुख व मा. नियंत्रक, महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे mauebpune@yahoo.co.in यांना परीक्षेच्या किमान १० दिवसपूर्वी सादर करावी.**

१०. दिव्यांग उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रांसह केलेल्या विनंती अर्जाची व त्यांच्या प्रमाणपत्रांची तपासणी करुन परीक्षेच्या वेळी मूळ प्रमाणपत्रांची पडताळणी करण्याचे अधीन राहून त्यांना मागणीप्रमाणे लेखनिकाची आणि/अथवा अनुग्रह कालावधीची परवानगी देण्यात येईल.

११. लेखनिकाची आणि/अथवा अनुग्रह कालावधीची मागणी केलेल्या दिव्यांग उमेदवारांनी परीक्षा सुरु होण्याच्या पूर्वी संबंधीत केंद्र प्रमुख/ समवेक्षक यांचेकडे सर्व संबंधीत मूळ प्रमाणपत्रे तपासणीकरिता सादर करणे आवश्यक आहे.

१२. काही अपवादात्मक परिस्थितीत परीक्षा सुरु होण्यापूर्वी ऐनवेळी लेखनिक बदलास मान्यता देण्याचे अधिकार संबंधीत परीक्षा केंद्र प्रमुखांना राहतील.

१३. उमेदवाराने स्वतः लेखनिकाची व्यवस्था केल्यास त्याच्या मानधनाची व्यवस्था उमेदवारास करावी लागेल.

१४. लेखनिकाने प्रश्न वाचून दाखवल्यानंतर उमेदवाराने सांगितलेले उत्तरच विहीत ठिकाणी छायांकित करणे/लिहिणे अपेक्षित आहे. उत्तराच्या निवडीबाबत अथवा लेखनिकाने कोणत्याही प्रकारे हस्तक्षेप/मार्गदर्शन/सुचना करु नये. लेखनिकाने परीक्षा कालावधीत प्रश्नोत्तराबाबत अथवा इतर कोणत्याही विषयी उमेदवारांशी चर्चा/गप्पा करु नयेत, तसेच, इतर लेखनिक/उमेदवार यांच्याशी बोलू नये. परीक्षा मंडळ कार्यालयाकडून अथवा परीक्षेच्या व लेखनिकावरील इतर कायदेशीर कारवाईसह संबंधित उमेदवाराची उमेदवारी रद्द करण्यात येईल अथवा परीक्षा मंडळ/कृषि विद्यापीठांच्या स्वेच्छाधिकारानुसार पुढील प्रक्रियेकरिता प्रतिरोधित (Debar) करण्यात येईल.

१५. लेखनिक उपलब्ध करुन देण्यात आलेल्या दिव्यांग विद्यार्थ्यास परीक्षा केंद्र प्रमुखांनी उपलब्ध करुन दिलेली बैठक व्यवस्था अनुज्ञेय राहील.

*********



**नियंत्रक**

**महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे**

# Maharashtra Agricultural Universities Examination Board, Pune

## Guidelines regarding use of Scribe /Reader and/or Compensatory Time by the Candidates with limitations/benchmark disabilities to read/write during CET examination

1) The facility of Scribe/Reader/Writer should be allowed to any person with benchmark disability/ies as defined under section 2(r) of the RPWD Act, 2016 and O.M. No.3402/2015/DD-III, dtd. 29.08.2018 and has limitation/s in reading/writing including that of speed if so desired by him/her.

2) The candidate should have the discretion of opting for his own Scribe/Reader/Writer.

3) It shall be ensured that qualification of the Scribe should not be more than the minimum qualification criteria of the examination. However, the qualification of the Scribe should always be matriculate or above from non-agriculture courses.

4) In case the candidate is allowed to bring his own Scribe/Reader, the qualification of the Scribe/Reader should be one step below the qualification of the candidate taking examination. The persons with benchmark disabilities opting for own Scribe/Reader should submit details of his/her own Scribe as per proforma provided herewith at **Annexure-I or -XI.**

5) There should be flexibility in accommodating any change in Scribe/Reader in case of emergency as to be decided by respective Examination Centre Incharge.

6) The 'Disability Certificate' and 'Certificate regarding physical limitation in an Examinee to read/write' issued by the Competent Govt. Medical Authority at any place from across the country should be accepted.

7) The "Extra time or Compensatory time" should not be less than **20 minutes per hour of examination** for persons who are allowed the use of own Scribe. All such candidates with benchmark disability/ies not availing the facility of Scribe should also be allowed additional time of **maximum 40 minutes** for this CET-Examination.

8) Proper seating arrangement (preferably on the ground floor) should be made prior to the commencement of examination to avoid confusion or discussion during the day of the exam.

   However, the seating arrangement made by respective Exam. Centre Incharge will be mandatory for such candidate.

9) It is to ensure that the above guidelines are scrupulously followed, while appearing for and conducting the CET examination for persons with benchmark disabilities to use their own Scribe with compensatory time or only to use compensatory time without Scribe.

10) Such candidate should apply to the respective **Exam. Centre Incharge and the Controller, MAUEB, Pune (mauebpune@yahoo.co.in) by e-mailing** their application with relevant given proforma **on or before the Exam Day**.

**Controller**
**MAUEB, Pune**

# प्रपत्र-१

## (विनंती अर्ज)

## दिव्यांग व्यक्तीसाठी लेखनिक व/किंवा अनुग्रह कालावधी मिळण्याबाबत दिनांक ---------२०२३ अथवा परीक्षेपूर्वी सादर करावयाचा विनंती अर्ज

**प्रति,**

**मा. परीक्षा केंद्र प्रमुख,**
**(PG-CET-2023/ ~~Ph.D.-CET-2023~~)**
**परीक्षा केंद्रः** ---------------------------
---------------------------

**विषय :- दिव्यांग उमेदवारास परीक्षेच्या वेळी लेखनिक (Scribe) व/किंवा अनुग्रह कालावधीचा (Compensatory/ Extra time) वापर करणेबाबत...**

महोदय,

मी दिव्यांग उमेदवार असून महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळातर्फे आयोजित PG/~~PhD~~-CET-2023 या सामाईक प्रवेश प्रक्रियेसंदर्भात प्रसिध्द करण्यात आलेल्या जाहिरातीस अनुसरुन परीक्षा मंडळास अर्ज सादर केला आहे.

१. सदर परीक्षेच्या उमेदवारी संदर्भातील माझी माहिती खालीलप्रमाणे आहेः
   १) उमेदवाराचे नाव ..........................................................................................
   २) Application No. (अर्ज क्रमांक)........................................................................
   ३) परीक्षेचा प्रस्तावित दिनांक ..............................................................................
   ४) प्रोफाईलमधील नोंदणीकृत भ्रमणध्वनी क्रमांकः ...................................................
   ५) प्रोफाईलमधील नोंदणीकृत ई-मेल आयडी : ..........................................................

२. मी Blindness/ Locomotor disability-both arm affected-BA/ Cerebral palsy [अंधत्व, अस्थीव्यंग (दोन हात प्रभावित), मेंदूचा पक्षाघात किंवा इतर दिव्यांगत्व] या दिव्यांगत्व प्रकारातील व्यक्ती असून परीक्षेच्या वेळी स्वतः उत्तरे लिहिण्यासाठी मी सक्षम नाही. दिव्यांग उमेदवारांना लेखनिक पुरविण्या संदर्भातील शासनाच्या तसेच परीक्षा मंडळाच्या नियम/सुचनांनुसार मला **लेखनिकाची/ अनुग्रह कालावधीची** आवश्यकता आहे.

३. विहित दिव्यांगत्वाबाबतच्या सक्षम प्राधिका-याने प्रदान केलेल्या वैध प्रमाणपत्राची प्रत सोबत जोडली आहे.

४. प्रस्तुत परीक्षेकरिता लेखनिकाची व्यवस्था मी स्वतः करणार असून लेखनिक म्हणून मी निवडलेल्या व्यक्तीचा तपशील खालीलप्रमाणे आहे ***(लागू असल्यास, खालील तपशील भरावा)***:

४.१ लेखनिकाचे नाव : ..........................................................................................

४.२ लेखनिकाचा जन्मदिनांक :.....................................................................................

४.३ लेखनिकाचे जन्मठिकाण :.....................................................................................

४.४ लेखनिकाचा कायम रहिवासाचा पत्ता :.......................................................................

४.५ लेखनिकाचा ओळखपत्र क्रमांकः..................................................................................
(आधार कार्ड, पॅन कार्ड, स्मार्ट कार्ड प्रकारचे ड्रायव्हिंग लायन्सस, मतदान ओळख पत्र, पासपोर्ट यापैकी एक)

४.६ लेखनिकाचा आधार क्रमांकः.....................................................................................

४.७ मोबाईल नंबरः १. उमेदवार ............................. २. लेखनिक .......................................

४.८ लेखनिकाची शैक्षणिक अर्हताः.....................................................................................

४.९ उमेदवाराचे लेखनिकाशी नाते (असल्यास) :..................................................................

४.१० लेखनिकानाची कृषि विद्यापीठांमार्फत कोणत्याही पदावर निवड झाली आहे काय? होय/ नाही

४.११ कृषि किंवा संलग्न पदवी/पदविका परीक्षा देत/ दिली आहे काय? होय/ नाही

४.१२ लेखनिकाने यापूर्वी एखाद्या उमेदवारास मदत आहे काय? होय/ नाही (केली असल्यास)

१) उमेदवाराचे नाव : ....................................................................

२) परीक्षेचे नाव : PG-CET-2023 / ~~PhD-CET-2023~~

३) उमेदवाराचा बैठक क्रमांकः (Exam. Seat No.) ...................................................

५. दिव्यांग उमेवारांना लेखनिक पुरविण्यासंदर्भातील सर्व सुचना आम्ही वाचल्या असून त्यांचे काटेकारेपणे पालन करण्याबाबत हमी देतो.

६. लेखनिकाची मदत घेण्याबाबत अथवा अनुग्रह कालावधी घेण्याबाबत विहित निकषाची उमेदवारांकडून पुर्तता होत नाही अथवा उमेदवाराने स्वतःबद्दल तसेच लेखनिकाबद्दल दिलेली माहिती चुकीची/खोटी असल्याचे अथवा उमेदवारांकडून अथवा लेखनिकाकडून कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे कोणत्याही टप्प्यावर निदर्शनास आल्यास उमेदवाराची तसेच लेखनिकाची संबंधित परीक्षेची उमेवारी रद्द करुन उमेदवारास व लेखनिकास परीक्षा मंडळ/ कृषि परिषदेच्या स्वेच्छाधिकारानुसार प्रतिरोधित करण्यात येईल, अथवा इतरही कायदेशीर, कार्यवाही करण्यात येईल. अशा प्रकरणी संबंधीताची प्रवेश प्रक्रिया झाली असेल तर, त्याची समाप्ती योग्य ठरेल, याची आम्हास जाणीव आहे.

| | |
|---|---|
| **उमेदवाराची स्वाक्षरी/अंगठा**........................... | **लेखनिकाची स्वाक्षरी**................................ |
| **उमेदवाराचे नाव**........................................ | **लेखनिकाचे नाव** ..................................... |
| **दिनांक** .......................................... | **दिनांक** ....................................... *(लागु असल्यास)* |

**<u>सोबतः</u>**

**१) दिव्यांगत्वाबाबतच्या विहित वैद्यकिय प्रमाणपत्रांची छायाकिंत प्रत,**

**२) उमेदवाराच्या ऑनलाईन अर्ज <u>छायांकित प्रत</u> (Application Print/Acknowledgment Report),**

**३) दिव्यांग उमेदवार स्वतः उत्तरे लिहीण्यास सक्षम नसल्याचे प्रमाणपत्र (<u>प्रपत्र-२</u>) (Certificate regarding physical limitation in an examinee to read/write),**

**४) लेखनिक वापरासंबंधीचे वचन-पत्र (<u>प्रपत्र-३</u>)(Undertaking for using own scribe) *(लागु असल्यास)*,**

**५) लेखनिकाच्या आधार कार्डची/ओळखपत्राची उमेदवाराने व लेखनिकाने स्वसाक्षांकित केलेली प्रत (*लागु असल्यास*).**

---

**<u>प्रतः</u> मा. नियंत्रक, महाराष्ट्र कृषि विद्यापीठे परीक्षा मंडळ, पुणे यांना माहितीस्तव ई-मेल व्दारे mauebpune@yahoo.co.in सविनय सादर.**

<u>प्रपत्र-२</u>

# Certificate regarding physical limitation in an Examinee to read/write
## (दिव्यांग उमेदवार स्वतः उत्तरे लिहिण्यास सक्षम नसल्याचे प्रमाणपत्र)

This is to certify that, I have examined Mr./Ms./Mrs. ....................................................... ............................. ................................ (Full name of the Candidate with disability), a person with ......................................................................................... (Nature and percentage of disability as mentioned in the certificate of disability), S/o/D/o..................................................................................................., a resident of ............................................................................... (Village/ District/ State) and to state that he/she has physical limitation, which hampers his/her reading/writing capabilities owing to his/her disability.

**Signature**
**Chief Medical Officer/ Civil Surgeon/ Medical Superintendent**
**of a Government Healthcare Institution**

Name and Designation:

Name of Government Hospital/ Health /Care Centre with Seal:

Place:

Date :

***Note:*** *Certificate should be given by a Specialist of the relevant stream/ disability (e.g. Visual impairment-Ophthalmologist, Locomotor disability- Orthopaedic Specialist/PMR, Cerebral Palsy, etc.)*

# प्रपत्र-३

# Letter of Undertaking for Using Own Scribe

## (लेखनिक वापरासंबंधीचे वचन-पत्र)

I ........................................................................................................ (Full Name) a candidate with ............................................................................. (Name of the disability) appearing for the **PG-CET-2023**/~~Ph.D-CET-2023~~ Examination bearing Application No./ Exam. Seat No. ..................................... at...............................................................(Name of the Exam Centre) in the District ………............................... of Maharashtra.

My qualification is ...............................................................

I do hereby state that Mr./Ms./Mrs. ................................................................ (Name of the Scribe) will provide the service of Scribe/Reader for the undersigned for taking the aforesaid examination.

I do hereby undertake that his/her qualification is ......................................................... In case, subsequently, if it is found that his/her qualification is not as declared by the undersigned and is higher than my qualification, I shall forfeit my right to the admission and claims relating thereto.

Signature /Thumb impression of the Candidate with Disability

Place:

Date :